संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

जनसंपर्क विभाग

---

**<u>विद्यापीठाचा अॅकेडेमिक ऑडीट जागरुकता व प्रशिक्षण कार्यक्रम 21 ते 25 सप्टेंबर</u>**

**<u>"पूल ऑफ एक्सपर्ट" तयार करण्याची कारवाई सुरु</u>**

**<u>'1200 पात्र सहभागी यांना वैयक्तीक ई-मेल'</u>**

अमरावती -

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 प्रमाणे विद्याविषयक लेखा परिक्षेच्या माध्यमातून (अॅकेडेमिक ऑडीट) महाविद्यालयांचे संलग्नीकरण चालू ठेवण्याची तरतूद आहे. या अनुषंगाने विद्यापीठाने विद्याविषयक लेखा परिक्षा (अॅकेडेमिक ऑडीटची) मानके व कार्यप्रणाली (नॉम्र्स अॅन्ड प्रोसिजर) तयार केलेली असून निदेश क्र. 5/2020 दि. 18/06/2020 यासाठी निर्गमित करण्यात आलेला आहे. शैक्षणिक सत्र 2021-22 पासून विद्याविषयक लेखा परिक्षणाच्या माध्यमातून महाविद्यालयांचे संलग्नीकरण चालू ठेवावयाचे आहे.

उपरोक्त मानके व कार्यप्रणाली प्रमाणे जागृकता व प्रशिक्षणाचा कार्यक्रम व पॅनल डिसकशन इत्यादी ऑनलाईन-व्ही.डी.ओ. च्या माध्यमातून दि. 21 ते 25 सप्टेंफ्रार, 2020 दरम्यान होतील. विद्याविषयक लेखा परिक्षण जागृकता कार्यक्रम (अवेअरनेस) करिता विद्यापीठातील अधिसभा, व्यवस्थापन परिषद, व विद्या परिषदेतील सर्व शिक्षक सदस्य, विद्यापीठातील निवडक अधिकारी, सर्व प्राचार्य, प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, आय.क्यू.ए.सी./नॅक/एन.बी.ए. चे समन्वयक इत्यादींचा एक गट.

विद्याविषयक लेखा परिक्षण प्रशिक्षण (अॅकेडेमिक ऑडीट ट्रेनिंग प्रोग्राम) करिता 10 वर्षे व त्यापेक्षाअधिक अनुभव असलेले सहा. प्राध्यापक, ग्रंथपाल, संचालक शारीरिक शिक्षण व क्रीडा तसेच 15 वर्षे व त्यापेक्षा अधिक अनुभव असलेले मुख्यलिपिक, अधिक्षक, प्रफ्रांधक यांचा दुसरा गट यांचेकरिता आयोजित केलेला आहे. या क्रायक्रमात सहभागी होणाया मधून 'पूल ऑफ एक्सपर्ट' तयार होईल.

उपरोक्त कार्यक्रमात सहभागी होण्याकरिता सर्वपात्र सहभागींना त्यांच्या..त्यांच्या ई-मेलवरील पत्र व त्या संदर्भातील माहितीपत्र पाठविण्यात येत आहे. सदर माहितीपत्रका प्रमाणे नोंदणी व कार्यक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, यांनी केले आहे.

---

प्रति, जनसंपर्क विभाग

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. 18/09/2020.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**प्र. जनसंपर्क अधिकारी**